शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ४४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्याच्या रेशीम कोष बाजारपेठेत किलोला ८२० रुपयांचा दर

### रेशीम उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंद! दिशा सिल्ककडून खरेदी



**जालना - प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना येथील रेशीम कोष बाजारपेठेत रेशीम कोषाला प्रतिकिलो ८२० रुपयांचा दर मिळाल्याने रेशीम उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. खांडवी (ता. परतूर) येथील शेतकरी मदन रंगनाथ बरकुले यांच्या उत्पादित रेशीम कोषाला प्रतिकिलो ८२० रुपये, तर गोविंद रंगनाथ बरकुले यांच्या रेशीम कोषाला प्रतिकिलो ८१५ रुपये दर मिळाला. या व्यवहारामुळे जालना जिल्ह्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळाले असून, रेशीम शेतीच्या माध्यमातून शेतीला पूरक उत्पन्न मिळविण्याच्या संधी पुन्हा एकदा अधोरेखित झाल्या आहेत. कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना आणि जिल्हा रेशीम कार्यालय, जालना यांच्या समन्वयातून रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादित रेशीम कोष विक्रीसाठी स्थानिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली आहे. या बाजारपेठेमुळे शेतकऱ्यांना आपला माल विक्रीसाठी योग्य व्यासपीठ मिळत असून, खरेदीदारांच्या सहभागातून रेशीम कोषाच्या खरेदी-विक्रीला चालना मिळत आहे. अलीकडील व्यवहारात मिळालेला समाधानकारक दर हा रेशीम उत्पादकांसाठी उत्साह वाढविणारा ठरत आहे. जालना येथील रेशीम कोष बाजारपेठेत झालेल्या व्यवहारात मदन रंगनाथ बरकुले यांच्या रेशीम कोषाला प्रतिकिलो ८२० रुपये दर मिळाला. त्याचबरोबर गोविंद रंगनाथ बरकुले यांच्या उत्पादित रेशीम कोषाची प्रतिकिलो ८१५ रुपये दराने खरेदी करण्यात आली. या दोन्ही व्यवहारांतून उत्पादकांना बाजारपेठेतील खरेदी-विक्री प्रक्रियेचा लाभ मिळाला. सदर रेशीम कोषाची खरेदी दिशा सिल्क, जालना यांनी केली.

रेशीम कोषाला मिळणारा दर हा उत्पादनाचा दर्जा, बाजारातील मागणी आणि खरेदीदारांचा सहभाग अशा विविध घटकांवर अवलंबून असतो. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनाची विक्री करण्यासाठी सुसज्ज बाजारपेठ उपलब्ध असणे महत्त्वाचे ठरते. जालना येथील बाजारपेठेत प्रतिकिलो ८२० रुपयांचा दर मिळाल्याने रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना चांगल्या बाजारभावाची आशा निर्माण झाली आहे. शेतीतील वाढता उत्पादन खर्च, हवामानातील अनिश्चितता आणि पारंपरिक पिकांच्या उत्पन्नातील चढ-उतार यामुळे शेतकरी पर्यायी तसेच पूरक व्यवसायांचा विचार करत आहेत. अशा परिस्थितीत रेशीम शेती हा शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे अतिरिक्त साधन ठरू शकणारा कृषिपूरक व्यवसाय आहे. योग्य तांत्रिक मार्गदर्शन, दर्जेदार उत्पादन, कीटक संगोपनाचे नियोजन आणि विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध झाल्यास या व्यवसायातून आर्थिक संधी निर्माण होऊ शकतात.

रेशीम कोष उत्पादनासाठी आवश्यक तांत्रिक बाबींचे पालन करणे, तुती लागवडीचे योग्य नियोजन करणे आणि रेशीम अळीचे *(पान २ वर)*

## दीड वर्षापासून 'मृत्यूचा सापळा' ठरलेल्या विद्युत पोलच्या स्थलांतराला मंजुरी!

### नगरसेविका संध्या देठे यांच्या पाठपुराव्याला यश; प्रत्यक्ष काम सुरू होण्याची प्रतीक्षा

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिका कार्यालयासमोरील प्रभाग क्रमांक ९ मध्ये स्वामी विवेकानंद चौक ते महात्मा गांधी रोडदरम्यान रस्त्याच्या मधोमध असलेल्या जुन्या आणि धोकादायक विद्युत पोलच्या स्थलांतराचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. मागील दीड वर्षापासून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण करणाऱ्या या विद्युत पोलच्या स्थलांतरासाठी महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयाकडून अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे. महिला व बालकल्याण



समितीच्या सभापती तथा प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेविका सौ. संध्या संजय देठे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याचे मानले जात आहे. मात्र, अंदाजपत्रक मंजूर झाले असले, तरी प्रत्यक्ष स्थलांतराचे काम कधी सुरू होणार, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जालना शहरातील स्वामी विवेकानंद चौक ते महात्मा गांधी रोडदरम्यान रस्त्याच्या मधोमध असलेला हा विद्युत पोल दीर्घकाळापासून धोकादायक स्थितीत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. वर्दळीच्या रस्त्यावर असलेल्या या पोलमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे हा पोल स्थलांतरित करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात होती. या समस्येची गंभीरता लक्षात घेऊन नगरसेविका संध्या देठे यांनी महावितरण प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. यासंदर्भात त्यांनी तब्बल चार वेळा लेखी पत्रव्यवहार करून विद्युत पोल स्थलांतरित करण्याची मागणी केली होती. मात्र, त्यांच्या म्हणण्यानुसार, वारंवार निवेदने देऊनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न कायम राहिला.

दीड वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर तोडगा निघत नसल्याने संध्या देठे यांनी आक्रमक भूमिका घेतली. सात दिवसांच्या आत धोकादायक विद्युत पोल हटविण्याची कार्यवाही न झाल्यास उपोषण करण्याचा इशारा *(पान २ वर)*

## लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे १ नोव्हेंबरला विश्वशांती पोस्टर स्पर्धा

### 'मानवतावादी सामंजस्य' विषयातून बालचित्रकार देणार विश्वशांतीचा संदेश

**जालना - प्रतिनिधी**

मानवतेतील सामंजस्य, जागतिक शांतता, बंधुभाव आणि परस्पर सहिष्णुतेची मूल्ये बालमनात रुजविण्याच्या उद्देशाने लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ जालनाच्यावतीने व शंभर शिक्षक क्लब समूह, कला शिक्षक समूह यांच्या सहकार्याने 'पीस पोस्टर कॉन्टेस्ट अर्थात विश्वशांती पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मानवतावादी सामंजस्य हा या स्पर्धेचा विषय असून, दि. १ नंबर रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रीय हिंदी विद्यालयात ही स्पर्धा होणार आहे. त्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन, दिनांक २५ ऑक्टोबर पर्यंत नावनोंदणी करावी, असे आवाहन जालना लायन्स क्लबचे सचीव गणेश कामड यांनी केले आहे.

या स्पर्धेच्या अनुषंगाने बुधवार दिनांक १४ ऑक्टोबर रोजी सर्व शाळांच्या कला शिक्षकांची बैठक घेण्यात येऊन या स्पर्धेबाबत आणि विद्यार्थ्यांची तयारी कशी करून घ्यायची, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. स्पर्धेतील पहिल्या १० उत्कृष्ट कलाकृतींची पारितोषिकासाठी निवड केली जाणार असून, ह्या कलाकृती लॉयन्स इंटरनॅशनलच्या जागतिक स्तरावरील पीस पोस्टर स्पर्धेसाठी पाठवल्या जाणार आहेत. त्यातून निवड होणाऱ्या कलाकृतींना ५००० डॉलरचे बक्षीस दिले जाणार असून, विद्यार्थ्यांच्या जाण्या येण्याचा खर्च क्लबतर्फे केला जाणार आहे.

जागतिक स्तरावर शांतता, मानवता आणि परस्पर आदराचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव व्यक्त करण्याची तसेच आपल्या कलागुणांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठाशी जोडण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेत १६ नोव्हेंबर २०१२ ते १५ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत जन्मलेली मुले व मुली सहभागी होण्यास पात्र आहेत. पोस्टरसाठी १३ २० इंच (३३ ५० सेंटीमीटर) किंवा २० २४ इंच (५० ६० सेंटीमीटर) यापैकी कोणताही एक आकार निवडता येईल. पोस्टरच्या चारही बाजूंना एक इंचाचे मार्जिन ठेवणे बंधनकारक आहे. स्पर्धकांना वॉटर कलर, पोस्टर कलर, रंगीत *(पान २ वर)*

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आज जालना जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करणार

**जालना -प्रतिनिधी**

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे उद्या दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून ते जालना जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करणार करणार आहेत.

नामदार रामदास आठवले हे छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ११ वाजता बदनापूर तालुक्यातील देवगाव - कुसळी येथील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेणार आहेत. यानंतर जालना शहरात पत्रकार परिषद घेऊन ते बीड



जिल्ह्याकडे रवाना होणार आहेत.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ( आठवले गट) पदाधिकारी तसेच युवक आघाडी, महिला आघाडी , कामगार व अल्पसंख्याक आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी नामदार रामदास आठवले यांच्या दुष्काळी दौऱ्याप्रसंगी उपस्थित *(पान २ वर)*

## जलसेवा संकल्प अभियानांतर्गत पाणी वापर संस्थांची कार्यशाळा आयोजित करावी - भाजपा गजानन जोशी

### पाणी व्यवस्थापन, सिंचन नियोजन आणि शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचवावे

**जालना - प्रतिनिधी**

जलसंपत्तीचे प्रभावी व्यवस्थापन, सिंचन व्यवस्थेचे योग्य नियोजन आणि शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जलसेवा संकल्प अभियानांतर्गत पाणी वापर संस्थांची विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात यावी, अशी मागणी मराठवाडा प्रसिद्धीप्रमुख भाजपा गजानन जोशी यांनी केली आहे. पाण्याचा काटकसरीने वापर, उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन, सिंचन व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे आणि शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचविणे, या बाबींना प्राधान्य देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. शेतीच्या उत्पादनवाढीसाठी पाणी हा अत्यंत महत्त्वाचा घटक



आहे. पावसातील अनिश्चितता,वाढती पाणीटंचाई,भूजल पातळीतील घट आणि सिंचनाच्या पाण्याचे असमान वितरण यांमुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब योग्य पद्धतीने वापरणे आणि पाणी वितरणाची व्यवस्था अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. यासाठी पाणी वापर संस्थांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा ठरू शकतो. पाणी वापर संस्थांच्या सक्षमीकरणावर भर दिला जावा,पाणी वापर संस्था या सिंचन व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या सहभागातून पाणी वितरण सुरळीत करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. मात्र,संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना पाणी नियोजन, पाणी वितरणाचे वेळापत्रक, कालव्यांची देखभाल, पाणीपट्टी व्यवस्थापन आणि उपलब्ध जलसाठ्याचा कार्यक्षम वापर याबाबत नियमित प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे. जलसेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून संबंधित विभागांनी पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी प्रतिनिधी आणि सिंचन विभागातील अधिकारी यांची संयुक्त कार्यशाळा आयोजित करावी. या कार्यशाळेत प्रत्यक्ष सिंचन क्षेत्राविषयीच्या समस्या समजून घेऊन त्यावर व्यवहार्य उपाययोजना निश्चित करण्यात याव्यात. संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे, शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे आणि पाणी वितरणाबाबत समन्वय निर्माण करणे यावर विशेष भर देण्यात यावा. शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचणे *(पान २ वर)*

> शेतकऱ्यांना सिंचनासाठी वेळेवर पाणी उपलब्ध व्हावे, पाण्याच्या वापरात शिस्त निर्माण व्हावी आणि ग्रामीण भागात शाश्वत जलव्यवस्थापनाची चळवळ उभी राहावी, यासाठी संबंधित यंत्रणांनी पुढाकार घ्यावा.
>
> **-गजानन जोशी**
> **मराठवाडा प्रसिद्धीप्रमुख,भाजपा**

## १०८ रुग्णवाहिका चालक व डॉक्टरांवरील हल्ल्याचा CITU कडून तीव्र निषेध

### दोषींवर कठोर कारवाई करा; १०८ कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करा

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील राजूर रोडवरील मानदेवळगावाजवळ १०८ रुग्णवाहिकेचे चालक (पायलट) आणि डॉक्टर यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा १०८ रुग्णवाहिका चालक युनियन महाराष्ट्र राज्य, संलग्न सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स () यांच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. या घटनेची सखोल चौकशी करून हल्ल्यात सहभागी असलेल्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच महाराष्ट्रातील सर्व १०८ रुग्णवाहिका कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवासी जिल्हाधिकारी



शशिकांत हादगल, अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. विक्रम साळी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, रुग्णसेवेचे कर्तव्य बजावत असताना रुग्णवाहिकेच्या चालकाला व डॉक्टरांना मारहाण करण्यात आली. तसेच रुग्णवाहिकेचे नुकसान करून डॉक्टरांचे मोबाईल व बॅग हिसकावून घेतल्याचे वृत्त समोर आले आहे. ही घटना अत्यंत गंभीर आणि निंदनीय असून, त्यामुळे आपत्कालीन आरोग्यसेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. १०८ रुग्णवाहिका सेवा ही आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांचे प्राण वाचविणारी महत्त्वाची जीवनरक्षक सेवा आहे. या सेवेत कार्यरत असलेले चालक आणि डॉक्टर दिवस-रात्र कोणत्याही परिस्थितीत रुग्णांना तातडीने वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी कार्यरत असतात. मात्र, जनतेचे प्राण वाचविण्यासाठी धावणाऱ्या कर्मचाऱ्यांवरच हल्ले होत असतील, तर ही अत्यंत चिंताजनक बाब असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

**दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी**

या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून मारहाण, धमकी, लूटमार आणि रुग्णवाहिकेचे नुकसान यामध्ये सहभागी असलेल्या सर्व संबंधित व्यक्तींवर लागू कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. *(पान २ वर)*

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य केल्याबद्दल भाजपा जिल्हाध्यक्ष ग्रामीण नारायण कुचे यांनी केले देवाभाऊंचे अभिनंदन

**जालना - प्रतिनिधी**

गेल्या पाच दशकांत अनुभवला नाही अशा भीषण दुष्काळाचे सावट महाराष्ट्रावर दाटले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील महायुती सरकारने पाणी, पीक आणि चारा नियोजनाबरोबरच, उद्योगांना दिलासा देणाऱ्या उपाययोजना केल्या आहेत. राज्यातील ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असून शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांचे अग्रिम अर्थसहाय्य जमा करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल भाजपचे जिल्हाध्यक्ष श्री.नारायण कुचे यांनी शेतकऱ्यांच्या वतीने फडणवीस सरकारचे अभिनंदन केले आहे. या महत्वपूर्ण निर्णयामुळे



राज्यातील साडेतीन लाख कुटुंबांच्या कर्जमाफीचा मार्ग मोकळा करून बळीराजाला मोठा दिलासा दिला आहे, अशा शब्दांत श्री.नारायण कुचे यांनी समाधान व्यक्त केले. दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीकरिता तगादा लावणाऱ्या यंत्रणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सक्त तंबी दिली असून पिण्याचे पाणी आणि पुरेशा चारा उपलब्धतेसाठी ठोस उपाययोजनांद्वारे दुष्काळाशी दोन हात करण्याची तयारी करून फडणवीस सरकारने एक आदर्श उभा केला आहे. दुष्काळी तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात आले असून जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध व्हावा याकरिता चारा देणाऱ्या पिकांचे नियोजन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांकडून हमीभावाने चारा खरेदी करण्याचा निर्णय घेऊन जनावरांना जगविण्याची हमी सरकारने घेतल्याने शेतकऱ्यांनीही दुष्काळाचा सामना करण्यासाठी हातात हात घालून सरकारला साथ द्यावी असे आवाहनही त्यांनी केले. राज्यातील दुष्काळी स्थिती ही नैसर्गिक आपत्ती आहे. *(पान २ वर)*

# संपादकीय...

## पाहणीचा फार्स नको; जमिनीवर काम दिसू द्या!

रस्त्यांवरील खड्डे, त्यातून होणारी नागरिकांची गैरसोय आणि अपघातांचा धोका हा आता केवळ वाहतुकीचा प्रश्न राहिलेला नाही, तर तो प्रशासकीय उत्तरदायित्वाचाही प्रश्न बनला आहे. मंठा चौफुली ते न्हावा या मार्गाची दुरवस्था पाहून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत, दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे आणि ते दर्जेदार पद्धतीने विहित वेळेत पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देशही संबंधित यंत्रणेला दिले. मात्र, या पाहणीनंतरही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नसेल, तर एक साधा पण अस्वस्थ करणारा प्रश्न उपस्थित होतोजिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश प्रत्यक्ष कृतीत उतरणार कधी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एखाद्या समस्येची प्रत्यक्ष पाहणी करणे, तिचे गांभीर्य समजून घेणे आणि संबंधित विभागाला तातडीने कार्यवाहीचे आदेश देणे, ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. परंतु अशा पाहणीचे यश छायाचित्रांमध्ये, प्रसिद्धीपत्रकांमध्ये किंवा आदेशांच्या नोंदींमध्ये मोजता येत नाही. त्याचे खरे मूल्यमापन नागरिकांच्या प्रत्यक्ष अनुभवावरूनच झाले पाहिजे. रस्त्यावरील खड्डे बुजले का, प्रवास सुरक्षित झाला का आणि नागरिकांची गैरसोय कमी झाली का, या प्रश्नांची उत्तरेच प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा खरा निकष ठरतात. मंठा चौफुली ते न्हावा हा मार्ग वाहनधारकांच्या दैनंदिन दळणवळणासाठी महत्त्वाचा आहे. या मार्गावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी खड्डे धोकादायक ठरू शकतात. वाहनांचे नुकसान, प्रवासासाठी लागणारा अतिरिक्त वेळ आणि अपघातांची संभाव्यता यामुळे या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी रास्त आहे. अशा परिस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन पाहणी केली, ही बाब समस्येच्या गांभीर्याची जाणीव करून देणारी आहे. परंतु पाहणी होऊनही काम सुरू झाले नसेल, तर संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. काम सुरू न होण्यामागे तांत्रिक अडचण आहे का, निधीची समस्या आहे का, प्रशासकीय मंजुरी प्रलंबित आहे का की कंत्राटदाराकडून दिरंगाई होत आहे? याची वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे कारण काहीही असले, तरी त्याचा फटका नागरिकांनी किती दिवस सहन करायचा? वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही नागरिकांना त्याच खड्डेमय रस्त्यावरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असेल, तर केवळ आदेश देऊन प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. रस्त्यांची दुरवस्था झाल्यानंतर नागरिक तक्रारी करतात. त्यानंतर प्रशासनाकडून पाहणी होते, संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातात आणि काम लवकर सुरू होईल, अशी अपेक्षा निर्माण होते. मात्र, प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्यास विलंब झाला, तर नागरिकांच्या मनात प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत साशंकता निर्माण होते. मंठा चौफुली ते न्हावा रस्त्याच्या बाबतीतही हीच वेळ येऊ नये. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशांचे पालन झाले की नाही, याची पडताळणी करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची आणि वरिष्ठ प्रशासनाची आहे. काम सुरू करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया कितपत पूर्ण झाली आहे, कामाची जबाबदारी कोणाकडे आहे आणि प्रत्यक्ष दुरुस्ती कधी सुरू होणार, याबाबत स्पष्टता असणे गरजेचे आहे. पाहणी म्हणजे समस्येची नोंद; निर्देश म्हणजे कार्यवाहीची सुरुवात; पण प्रत्यक्ष दुरुस्ती म्हणजे प्रशासनाच्या जबाबदारीची पूर्तता! या तीन टप्प्यांतील शेवटचा टप्पा गाठल्याशिवाय नागरिकांना दिलासा मिळणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी दुरुस्तीचे काम दर्जेदार पद्धतीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत, ही महत्त्वाची बाब आहे. पावसाळ्यानंतर अनेक रस्त्यांवर खड्डे पडतात आणि काही ठिकाणी तात्पुरती मलमपट्टी केली जाते. मात्र, काही दिवसांतच पुन्हा खड्डे निर्माण झाले, तर अशा दुरुस्तीचा उपयोग काय नागरिकांच्या पैशातून होणाऱ्या कामाचा दर्जा टिकणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीची दुरुस्ती करताना तांत्रिक निकषांचे पालन करावे. वापरण्यात येणारे साहित्य, कामाची पद्धत आणि पूर्ण झालेल्या कामाची गुणवत्ता यावर देखरेख ठेवली पाहिजे. काम पूर्ण झाल्यानंतर त्याची तपासणीही झाली पाहिजे. तातडी आणि गुणवत्ता या एकमेकांच्या विरोधात असलेल्या बाबी नाहीत. नियोजनबद्ध पद्धतीने काम केले, तर सुरक्षिततेची गरज पूर्ण करताना दर्जाही राखता येऊ शकतो. त्यामुळे काम सुरू करण्याच्या घाईत निकृष्ट दर्जाचे काम होऊ नये आणि दर्जाच्या नावाखाली अनावश्यक विलंबही होऊ नये. या प्रकरणात आता केवळ आश्वासनांपेक्षा ठोस कृतीची गरज आहे. संबंधित विभागाने काम सुरू न होण्याची कारणे स्पष्ट करावीत. आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून दुरुस्ती सुरू करण्याची निश्चित तारीख आणि काम पूर्ण करण्याची कालमर्यादा ठरवावी. जिल्हाधिकारी कार्यालयानेही दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा. काम सुरू झाले की नाही, किती भागातील खड्डे बुजविण्यात आले आणि दुरुस्तीची गुणवत्ता कशी राखली जात आहे, याची नियमित पडताळणी झाल्यासच आदेशांचा अपेक्षित परिणाम दिसून येईल. अन्यथा, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पाहणीचे रूपांतर केवळ औपचारिकतेत होण्याचा धोका आहे. नागरिकांना प्रत्येक वेळी तक्रारी कराव्या लागणे, त्यानंतर पाहणी होणे आणि पुन्हा कामाची प्रतीक्षा करावी लागणे, ही परिस्थिती बदलली पाहिजे. सार्वजनिक पायाभूत सुविधांबाबत प्रशासनाने प्रतिक्रियात्मक नव्हे, तर जबाबदार आणि परिणामकारक भूमिका घेतली पाहिजे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी मंठा चौफुली ते न्हावा रस्त्याची पाहणी करून संबंधित विभागाला आवश्यक निर्देश दिले आहेत. आता या निर्देशांची अंमलबजावणी किती वेगाने होते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. रस्त्याची दुरवस्था दूर करण्यासाठी प्रशासनाने आणखी किती पाहण्या कराव्यात, किती सूचना द्याव्यात आणि नागरिकांनी आणखी किती दिवस प्रतीक्षा करावी? आमच्या वृत्तपत्राची भूमिका स्पष्ट आहे, नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रश्नांवर केवळ पाहणी आणि आदेश पुरेसे नाहीत; त्यांची वेळेत अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. मंठा चौफुली ते न्हावा रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करून ते दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशांचा प्रत्यक्ष परिणाम रस्त्यावर दिसला पाहिजे. कारण नागरिकांना आश्वासनांचा नव्हे, तर सुरक्षित आणि खड्डेमुक्त प्रवासाचा अधिकार हवा आहे. आता प्रशासनाने विलंबाची कारणे स्पष्ट करून कामाला सुरुवात करावी आणि नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा द्यावा. पाहणी झाली, आदेश मिळाले; आता वेळ आहे ती कृतीची!

# शांततेच्या पुरस्कारासाठी केवळ दावे नव्हे, तर कृती महत्त्वाची!

जागतिक शांतता, मानवाधिकार आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला दिला जाणारा नोबेल शांतता पुरस्कार हा जगातील अत्यंत प्रतिष्ठेचा सन्मान मानला जातो. दरवर्षी या पुरस्काराची घोषणा होत असताना जगाचे लक्ष नॉर्वेजियन नोबेल समितीकडे लागलेले असते. यंदाही या पुरस्काराबाबत विशेष उत्सुकता होती. त्याचे एक कारण म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार मिळण्याची अपेक्षा होती. त्यांनी अनेकदा आपण शांततेसाठी मोठे कार्य केल्याचा दावा केला होता. मात्र, ९ ऑक्टोबर २०२६ रोजी पुरस्काराची घोषणा झाली आणि ट्रम्प यांची अपेक्षा अपूर्ण राहिली. यंदाचा शांततेचा नोबेल पुरस्कार दक्षिण आफ्रिकेतील ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ नावी पिल्ले यांना जाहीर झाला. ट्रम्प यांना हा पुरस्कार मिळाला नाही, यापेक्षा नावी पिल्ले यांना तो का मिळाला, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. पिल्ले यांनी आपले संपूर्ण आयुष्य न्याय, मानवाधिकार आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संरक्षणासाठी समर्पित केले आहे. वर्णद्वेषाविरुद्धच्या लढ्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी व्यवस्थेच्या काळात त्यांनी नेल्सन मंडेला यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी वकिली केली. पुढे त्यांनी दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केले. रवांडासाठीच्या आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायाधिकरणात आणि आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयातही त्यांनी न्यायाधीश म्हणून जबाबदारी सांभाळली. २००८ ते २०१४ या काळात त्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त होत्या. अमेरिकेचे परराष्ट्र धोरणही या संदर्भात चर्चेचा विषय ठरते. एकीकडे शांततेची भाषा करायची आणि दुसरीकडे शस्त्रास्त्रांची विक्री, लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन व सामरिक दबावाच्या माध्यमातून आपले हितसंबंध साधायचे, हा विरोधाभास अनेकदा दिसून येतो. शस्त्रास्त्रांची विक्री म्हणजे प्रत्येक वेळी युद्धाला प्रोत्साहन देणे असे नसले, तरी त्यांचा वापर कोणत्या कारणासाठी आणि कोणत्या परिस्थितीत होणार आहे, याची जबाबदारी विक्री करणाऱ्या देशानेही गांभीर्याने घेतली पाहिजे. विशेषतः भारतासारख्या देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने पाकिस्तानला होणाऱ्या शस्त्रपुरवठ्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अशा शस्त्रांचा वापर भारताविरुद्ध झाला, तर प्रादेशिक तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय कायदा आणि न्यायव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करणारा नावी पिल्ले यांचा सन्मान विशेष महत्त्वाचा ठरतो. नोबेल समितीने कोणत्याही एका नेत्याला लक्ष्य करण्याऐवजी कायद्याचे राज्य, न्याय आणि शांततापूर्ण सहअस्तित्व यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. नोबेल शांतता पुरस्कार हा कोणत्याही राष्ट्राध्यक्षाचा अधिकार नाही किंवा राजकीय प्रतिष्ठा वाढवण्याचे साधनही नाही. तो मिळवण्यासाठी शांततेप्रती प्रामाणिक बांधिलकी, मानवाधिकारांचा आदर आणि न्यायासाठी सातत्यपूर्ण कार्य आवश्यक असते. २०२५ मध्ये व्हेनेझुएलातील लोकशाहीच्या लढ्यासाठी मारिया कोरिना मचाडो यांना हा पुरस्कार मिळाला, तर २०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानवाधिकारांसाठी कार्य करणाऱ्या नावी पिल्ले यांची निवड झाली. या दोन्ही निवडींमधून लोकशाही आणि न्यायाच्या रक्षणाचे महत्त्व स्पष्ट होते. डोनाल्ड ट्रम्प यांना यंदाचा नोबेल शांतता पुरस्कार मिळाला नाही, यावरून त्यांच्या प्रत्येक कृतीचे मूल्यमापन करता येणार नाही; परंतु शांततेसाठी केलेल्या कामाचे मूल्यमापन केवळ स्वतःच्या दाव्यांवर होऊ शकत नाही, हा संदेश निश्चितच मिळतो. शांतता ही भाषणांतून नव्हे, तर कृतीतून निर्माण होते. युद्ध रोखणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच अन्याय रोखणे, मानवाधिकारांचे संरक्षण करणे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर राखणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळेच यंदाच्या नोबेल शांतता पुरस्काराने नावी पिल्ले यांच्या कार्याचा गौरव करत जगाला एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. जगात खऱ्या अर्थाने शांतता प्रस्थापित करायची असेल, तर सत्तेपेक्षा न्यायाला आणि सामर्थ्यापेक्षा कायद्याला अधिक महत्त्व द्यावे लागेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**


दैनिक युवा आदर्श दि. १६-१०-२०२६

**PUBLIC NOTICE**

There is a discrepancy between the name mentioned in my 10th Standard Marksheet and my Aadhaar Card. My name is recorded as Kachare Sachin Tryambakrao in my 10th Standard Marksheet. Both names belong to one and the same person. I hereby declare that my correct and valid name, as mentioned in my Aadhaar Card, is Kachare Sachin Tryambakrao. The name mentioned in my Aadhaar Card is my true and correct name and shall be considered valid for all official and government purposes.

- Kachare Sachin Tryambakrao

दैनिक युवा आदर्श दि. १६-१०-२०२६

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
PATIL SACHIN RAVINDRA
To New Name
SACHIN RAVINDRAKUMAR PATIL
For Passport Issuence
Add- Gundevadi, gundewadi, Dist. Jalna.
431203.


पान १ व ४ वरुन...

### जालन्याच्या रेशीम...

संगोपन शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक असते. उत्पादनाचा दर्जा टिकवून ठेवण्यासोबतच शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची विक्री करण्यासाठी पारदर्शक आणि सुलभ व्यवस्था मिळाल्यास रेशीम उद्योगाचा विस्तार होण्यास मदत होऊ शकते. कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना आणि जिल्हा रेशीम कार्यालय यांच्या माध्यमातून रेशीम उत्पादकांना विक्रीची सुविधा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे. स्थानिक पातळीवर बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे उत्पादक आणि खरेदीदार यांच्यात थेट व्यवहाराची संधी निर्माण होते. त्यामुळे बाजारातील मागणी आणि मिळणाऱ्या दराची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होते. रेशीम उद्योगाच्या विकासासाठी केवळ उत्पादन वाढविणे पुरेसे नसून, उत्पादित मालाला योग्य बाजारभाव मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी नियमित खरेदी-विक्री व्यवहार, खरेदीदारांचा सहभाग, शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेची माहिती या बाबींची सांगड घालणे आवश्यक आहे. जालना येथील बाजारपेठेत मिळालेला दर या दृष्टीने सकारात्मक मानला जात आहे. रेशीम कोषाच्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक परमेश्वर वरखडे, रेशीम विकास अधिकारी निर्मला उगले, सहायक निबंधक सहकारी संस्था, बदनापूर येथील परेश बेरा, सहायक निबंधक सहकारी संस्था, जालना येथील प्रणव वाघमारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव भरत तनपुरे यांच्यासह भरत जायभाये, अमोल सोनटक्के, गजानन जन्हाड, किशोर गोल्डे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. जालना येथील रेशीम कोष बाजारपेठेत मिळालेला प्रतिकिलो ८२० रुपयांचा दर हा जिल्ह्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनदायी ठरला आहे. बाजारपेठेची उपलब्धता आणि खरेदीदारांचा सहभाग वाढत राहिल्यास जिल्ह्यातील रेशीम उद्योगाला अधिक चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### दीड वर्षांपासून...

त्यांनी दिला होता. त्यानंतर या प्रकरणाचा पाठपुरावा अधिक तीव्र करण्यात आला. या प्रश्नात तांत्रिक अडचणी दूर करून आवश्यक मंजुरी मिळविण्यासाठी जालना महानगरपालिकेच्या विद्युत विभागाच्या अभियंता कोमल गावंडे आणि महावितरणचे सहायक अभियंता शेख यांनी सहकार्य केल्याचे संध्या देठे यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे. या अधिकाऱ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे प्रकरण पुढे सरकल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धोकादायक विद्युत पोलच्या स्थलांतरासाठी आवश्यक असलेले अंदाजपत्रक अखेर मंजूर झाले आहे. त्यामुळे पोल स्थलांतराच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला असून, प्रत्यक्ष काम सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे संध्या देठे यांनी म्हटले आहे.

मात्र, नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळण्यासाठी केवळ अंदाजपत्रक मंजूर होणे पुरेसे नाही. स्थलांतराचे काम सुरू होऊन ते निर्धारित वेळेत पूर्ण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी पुढील प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया तातडीने पूर्ण करून कामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील रस्ते, चौक आणि वर्दळीच्या मार्गांवरील विद्युत खांबांची सुरक्षितता हा महत्त्वाचा नागरी प्रश्न आहे. रस्त्याच्या मधोमध असलेले अडथळे, विशेषतः धोकादायक स्थितीतील विद्युत पोल, वाहनांच्या वाहतुकीस अडचणीचे ठरू शकतात. त्यामुळे अशा ठिकाणांची पाहणी करून आवश्यक ती दुरुस्ती किंवा स्थलांतर वेळेत करणे गरजेचे आहे. प्रभाग क्रमांक ९ मधील या विद्युत पोलच्या प्रश्नावर दीड वर्षानंतर का होईना, मंजुरी मिळाल्याने नागरिकांना दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. आता संबंधित यंत्रणा प्रत्यक्ष काम किती लवकर सुरू करतात आणि हा प्रश्न पूर्णपणे कधी निकाली काढतात, यावर या पाठपुराव्याच्या यशाचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

या कामासाठी सहकार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि पत्रकार बांधवांचे नगरसेविका संध्या देठे यांनी आभार मानले आहेत.

### लायन्स क्लब...

पेन्सिल, क्रेयॉन आदी माध्यमांचा वापर करता येईल. चित्र द्विमितीय (२ डी) स्वरूपाचे असावे. चित्रावर काडी, गवत, स्टिकर किंवा अन्य कोणतेही साहित्य चिकटवता येणार नाही. स्पर्धेसाठी आवश्यक ड्रॉइंग पेपर आयोजकांकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मानवतेतील एकात्मता, विविधतेतील ऐक्य, परस्पर सहकार्य आणि बंधुभाव यांचे दर्शन घडविणाऱ्या चित्रांची निर्मिती करून विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. २५ ऑक्टोबरपर्यंत या स्पर्धेसाठी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, कलाशिक्षक अथवा मिरा खरात (९४२०२ १८५५५), प्रकाश कुंडलकर (९४२३२ ७४६४२), सतीश संचेती (९४२२७ २३२६३), जगत घुगे (९४२२२ १८०८१), संगिता श्रोत्रीय (९४२२२६४००९), अशोक माधवले (८२७५३ ३३१९३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जालना लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. गिरीश पाकणीकर, सचिव गणेश कामड, कोषाध्यक्ष महावीर गिल्डा आणि कार्यकारिणीच्यावतीने करण्यात आले आहे.

### जलसेवा संकल्प...

आवश्यक असून,विविध ठिकाणी सिंचन प्रकल्प किंवा कालव्यांची सुविधा उपलब्ध असूनही पाणी वितरणातील अडचणींमुळे शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांना अपेक्षित पाणी मिळण्यात अडथळे येऊ शकतात. त्यामुळे केवळ जलसाठा निर्माण करणे पुरेसे नसून, उपलब्ध पाण्याचे न्याय्य आणि नियोजनबद्ध वितरण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी कालव्यांची नियमित देखभाल, पाणीगळती रोखणे, पाणी वितरणाचे वेळापत्रक निश्चित करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि प्रत्येक लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या गरजांचा विचार करणे आवश्यक आहे. पाणी वापर संस्थांनी संबंधित विभागांच्या समन्वयाने या बाबींचे नियोजन केल्यास सिंचन व्यवस्थेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होऊ शकते. सूक्ष्म सिंचन आणि जलसंधारणाला प्रोत्साहन द्यावे,बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा कार्यक्षम वापर करणाऱ्या आधुनिक सिंचन पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे. ठिबक सिंचन, तुषार सिंचन, शेततळी, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात यावे. पीकनिहाय पाण्याची गरज, जमिनीचा प्रकार, उपलब्ध जलसाठा आणि स्थानिक हवामान यांचा विचार करून सिंचनाचे नियोजन केल्यास पाण्याची बचत होण्यासोबतच शेती उत्पादन टिकविण्यास मदत होऊ शकते. यासाठी कृषी विभाग आणि जलसंपदा विभागाने संयुक्तपणे मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. कार्यशाळेत कृती आराखडा तयार करावा यासोबतच पाणी वापर संस्थांच्या कार्यशाळेत केवळ माहिती देण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्यामध्ये उपलब्ध पाण्याचा आढावा, लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या गरजा, सिंचनाचे वेळापत्रक, पाणी वितरणातील अडचणी, कालव्यांच्या दुरुस्तीची आवश्यकता आणि जलसंधारणाच्या संभाव्य उपाययोजनांचा समावेश असावा. तसेच पाणी वापर संस्थांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेणे, शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे आणि पाणी वितरणासंदर्भातील माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करून देणे यासाठी यंत्रणा विकसित करण्याची गरज आहे. सामूहिक सहभागातून जलसमृद्ध शेतीचे उद्दिष्ट बाळगले तर जलसेवा संकल्प अभियान हे पाण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासोबतच जलव्यवस्थापनाच्या प्रत्यक्ष कामांना चालना देणारे ठरेल. शासनाची यंत्रणा, पाणी वापर संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शेतकरी यांनी समन्वयाने काम केल्यास पाण्याचा अपव्यय कमी करून उपलब्ध जलसंपत्तीचा अधिक प्रभावी वापर करता येईल. ''पाण्याचे योग्य नियोजन, सक्षम पाणी वापर संस्था आणि शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत सिंचनाचे पाणी पोहोचविणे ही काळाची गरज आहे. जलसेवा संकल्प अभियानांतर्गत विशेष कार्यशाळा आयोजित करून पाणी व्यवस्थापनाला लोकसहभागाची जोड द्यावी. पाण्याचा प्रत्येक थेंब शेतीच्या समृद्धीसाठी उपयोगात आला पाहिजे,'' असे मत भाजपा मराठवाडा प्रसिद्धीप्रमुख गजानन जोशी यांनी व्यक्त केले.

### केंद्रीय राज्यमंत्री...

राहावे, असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश संघटन सचिव ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, मराठवाड्याचे नेते सुधाकर रत्नपारखे,युवक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. सिध्दार्थ चव्हाण, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जालना जिल्हाध्यक्ष मधुकर बोबडे, जिल्हा महानगराध्यक्ष महेंद्र रत्नपारखे,जिल्हा सरचिटणीस बबनराव रत्नपारखे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश रूपवते,मराठवाडा उपाध्यक्ष अंकुश चव्हाण,राजू भिंगारदेव,घुगे,राजेंद्र साबळे तसेच युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष लहू उघडे, महिला आघाडीच्या जिल्हा सचिव बेबीताई कांबळे,बदनापूर तालुकाध्यक्ष नईम बेग, अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजहर पठाण आदींनी केले आहे.

### १०८ रुग्णवाहिका चालक...

पीडित चालक व डॉक्टरांना योग्य वैद्यकीय उपचार, आवश्यक आर्थिक मदत आणि नियमानुसार इतर लाभ उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच १०८ रुग्णवाहिका पायलट व डॉक्टरांना आवश्यकतेनुसार पोलीस मदत उपलब्ध करून द्यावी. रुग्णवाहिकांमध्ये ट्रॅकिंग, आपत्कालीन सुविधा आणि नियंत्रण कक्षाशी त्वरित संपर्क साधण्यासाठी प्रभावी यंत्रणा उपलब्ध करून द्यावी. जोखमीच्या भागांत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. राज्यभरातील १०८ कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र सुरक्षा नियमावली लागू करा महाराष्ट्रातील सर्व १०८ रुग्णवाहिका चालक आणि डॉक्टरांसाठी हल्ला, धमकी किंवा अन्य धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास कोणती कार्यपद्धती अवलंबावी, याबाबत स्पष्ट सुरक्षा नियमावली लागू करावी. १०८ सेवा चालविणाऱ्या संबंधित कंपनीने कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी निश्चित करून हल्ल्याच्या प्रसंगी तातडीची मदत, कायदेशीर सहकार्य आणि आवश्यक संरक्षण उपलब्ध करून द्यावे. कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची त्वरित दखल घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणाही निर्माण करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. या मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच जिल्हा शल्यचिकित्सक आणि आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती संघटनेला द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. निवेदनावर डॉ. डी. एल. कराड, नागनाथ नरळे, मधुकर मोकळे, अनिल मिसाळ, बाबा शेख, गोपाल कदम, डॉ. रामेश हरणे, अच्युत राऊत, बाबासाहेब पाटोळे, विष्णू हिवाळे, रामेश्वर खरात, कृष्णा जाधव आणि संदीप रसाळ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना....

अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करण्याची गरज असताना या प्रश्नावर विरोधकांकडून केले जाणारे राजकारण दुर्दैवी आहे, अशी खंतदेखील श्री.नारायण कुचे यांनी व्यक्त केली. राज्यात साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचा वीजपुरवठा मोफत आहे. कर्जवसुलीच्या तगाद्यातून शेतकऱ्यास दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम मदत मिळणार आहे, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना सरसकट परीक्षा शुल्क माफ करण्यात येत आहे. याशिवाय राज्यातील दोन लाखांहून अधिक अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना दोन हजार रुपयांची भाऊबीज देऊन सरकारने कुटुंबप्रमुखाची जबाबदारी संवेदनशीलतेने पेलली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना बारा हजार रुपयांच्या वार्षिक सन्मान निधीमुळे समस्याग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून मोठा दिलासा मिळालेला आहे. यासाठी राज्याच्या तिजोरीतून सहा हजार कोटींहून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याने बळीराजासाठी संवेदनशीलतेने मदतीचा हात पुढे करणाऱ्या महाराष्ट्रातील फढणवीस सरकारचे अनुकरण काँग्रेसशासित राज्यांनी केले पाहिजे असा सल्लाही श्री.नारायण कुचे यांनी दिला. फडणवीस सरकारने पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जाहीर केलेली असताना, कर्नाटकातील काँग्रेस सरकारने मात्र दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांची केवळ अडीच हजार रुपये मदतीच्या घोषणेवर बोळवण केली आहे, याकडे श्री.नारायण कुचे यांनी लक्ष वेधले. फडणवीस सरकारने जाहीर केलेली मदत कर्नाटकापेक्षा दुप्पट असून महाराष्ट्र सरकारने मदत जाहीर केली असताना कर्नाटक सरकार मात्र अजूनही केंद्राकडून मदत मिळण्याची वाट पाहात असल्याने तेथील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्षात ही तपुटपुंजी मदत तरी वेळेवर मिळेल का याबाबत शंकाच आहे, असे ते म्हणाले. पीएम किसान सन्मान योजना, नमो शेतकरी योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, प्रधानमंत्री पीकविमा योजनेतील राज्याचा सहभाग, कृषी पंपांना वीजबील माफी, आणि दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत अशा अनेक योजनांद्वारे शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या असलेल्या फडणवीस सरकारने दुष्काळाला तोंड देण्याची सज्जता केली आहे. आता सर्वांनी मिळून त्याला साथ द्यावी, विरोधकांनी राजकारण न करता जनतेच्या हिताचा विचार करावा आणि पुढच्या पिढ्यांना दुष्काळाच्या समस्येतून कायमची मुक्ती देण्याच्या मुख्यमंत्री फडणवीस यांच्या संकल्पास शक्ती द्यावी, असे आवाहनही श्री.नारायण कुचे यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांना विनाअट...

निवेदनातून करण्यात आल्या आहेत. दुष्काळामुळे आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे जाधव यांनी म्हटले आहे. शेतकरी आत्महत्यांसारख्या गंभीर घटना घडू नयेत, यासाठी शासनाने संवेदनशीलतेने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी नमूद केले. या मागण्यांवर शासनाने त्वरित कार्यवाही न केल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्हा बंद आंदोलन पुकारण्यात येईल. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी शासनाची राहील, असा इशारा संजुभाऊ जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

# खाद्यपुर्तीसाठी अन्नाचा एक-एक-कण; सोबतच पाणी व निसर्ग वाचविण्याची गरज

विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील ''उपासमारी'' संपुष्टात येईल.खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ आक्टोंबर १९४५ ला ''खाद्य व कृषि संघटन'' ( एफएओ ) ची स्थापणा केली.''कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश''(एफएओ) ने १६ आक्टोंबर १९७९ पासून ''विश्व खाद्य दिवस''साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात ''आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस'' साजरा केल्या जातो.या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची(उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरूक करणे.उपासमारी,कुपोषण व गरीबीच्या विरूद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करणे.उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरू आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे.विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आनणे.परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की,या कार्यक्रमाच्या इतके वर्षांनंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवण सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.''अन्न हे पुर्ण ब्रम्ह'' म्हटल्या जाते.कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव,जीवजंतू,वन्यप्राणी,जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असतेच. त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे. अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते व निसर्गाचे संतुलन टिकवण्यासाठी वृक्षांची गरज असते. त्याचबरोर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर व निसर्गावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे.कारण पाणी रहाले तरच अन्नाचे उत्पादन होवु शकते.१६ आक्टोंबर संपूर्ण जग ''विश्व खाद्य दिवस''म्हणुन साजरा करतात.कारण खाद्यांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मिळवीण्यासाठी का धावपळ करतो?, मोल-मजुर, कामगारांना काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो ''वितभर पोटाची खळगी भरणे'' कारण काहीना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे यालाही नाकारता येत नाही. करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात उपासमारीची समस्या ओढावली होती.कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता. त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली होती.या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले.अशाप्रकारचे उग्ररूप करोणा काळात दीसुन आले.जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातुन घाम गाळतो व शेती पिकवितो. तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या ''पोटाची खळगी'' भरते. म्हणुनच शेतकऱ्यांना ''अन्नदाता'' म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येवु शकते.परंतु मानवजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे सर्वप्रथम १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी ''शतशत प्रणाम'' करतो. कारण ऊन,पाऊस,थंडी,ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो.भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच ''कृषिप्रधान देश''परंतु गेल्या ७९ वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी अत्यंत दुःखी असल्याचे दिसून येते.कारण आजच्या परिस्थितीत देशातील अनेक शेतकरी



कोरड्या दुष्काळाशी सामना करीत आहेत.शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही.सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही.त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते.आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे. परंतु ''आर्थिकदृष्ट्या कंगाल'' व शुन्य आहे.कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल,व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करतांना दिसतात.आज व्यापाऱ्याजवळ,राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला,सोने-नाने,चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी ''भोपळा'' आल्याचे दिसून येते.कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या ७९ वर्षांपासून आपण पहात आहोत.त्यामुळे आज शेतकरी वर्ग मागासलेला आहे.भारत स्वतंत्र झाल्यानंतरही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता भासू दिली नाही.परंतु चीनमध्ये १९७० मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते.म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप,कीडे-माकोडे व अन्य प्राणी खायला सुरुवात केली. चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्राण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली. अशा कठीण परिस्थितीतुन जावुनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे.परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पुर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता व एकनिष्ठता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊनच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात.आजही भारतात मेळघाट सारख्या व अतिदुर्गम भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का?याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे. आज भारतात उलटी गंगा वाहतांना दीसते देशातील ७० टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे.परंतु आजही भारतीय शेतकरी गरीब आहे.याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांचे फक्त रक्त पिण्याचे काम केल्याचे दिसून येते.त्यामुळेच आज भारतात अनेक भागातील अन्नदाता शेतकरी आत्महत्यां करतांना दिसतो.कारण त्यांची संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते.

आतातर वाढते प्रदुषण,ग्लोबल वॉर्मिग व अलनिनोच्या प्रभावामुळे मोठ्या प्रमाणात हवामानात बदल झाल्याने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत आनुण ठेवले आहे. विश्न खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकरी सरकारला विचारते की मुठभर नगरसेवक,आजी-माजी आमदार-खासदार व मंत्री मेहनत न करता पाच वर्षांत करोडपती व अरबोपती कसेकाय होतात? राजकीय पुढारी शेतकऱ्यांपेक्षा एवढा मोठा आहे का?की त्याला गलेलठ्ठ पगार, पेन्शन,इतर भत्ते सरकार देते व शेतकऱ्यांना भोपळा देते.हे लोकशाहीच्या देशात चालय्य तरी काय?सर्व राजकीय पुढारी सांगतात की आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत. समान अधिकार,समान न्याय असे खोकले आश्वासन देतात. परंतु आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारीच शेतकऱ्यांचा घात करतांना दिसत आहे.त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या प्रती जागरूकता दाखवुन विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली पाहिजे.आंतराष्ट्रिय माहिती नुसार जगात ''उपाश्यापोटी'' झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येत आहे.संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटना नुसार २००२ च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत १४० टक्याने भारीभरकम वाढ झाली आहे.यामुळे डिसेंबर २००७ पासुन ४० देशांना खाद्यांन्न संकटाचा सामना करावा लागत होता.सध्या गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध भयावह स्थितीमध्ये आहे आणि आणि आता अचानक इजरायल- हमास- हिज्बुल्ला-इराण-अमेरिका यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे.यामुळे युध्दाचा भडका महाभयानक स्थितीत आहे.याचा परिणाम अन्नसाठ्यावर होवून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे व पुढे आणखी भयावह परिस्थिती होऊ शकते. ''भारतीय खाद्य निगमने'' स्वतः कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील ५० करोड रुपयांचा अनाज म्हणजे १०.४० लाख मीट्रिक टन पर्यंत अनाज सडतो किंवा खराब होतो.हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर, दुःखद व चिंताजनक बाब आहे.कारण खराब होणारे अन्न-धान्य प्रत्येकवर्षी सव्वा करोड लोकांची भुक मीटवु शकते.परंतु भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की शेतकऱ्यांनी मेहनतीने तयार केलेला लाखो टन अनाज सडतो आणि यामुळेच भुकमरीची समस्या उद्भवत आहे याला नाकारता येत नाही. यामुळेच भारतात करोडो लोक उपाश्यापोटी झोपतांना दीसतात.भारताची हेही समस्या आहे की सहा वर्षांखालील ४७ टक्के मुले कुपोषणाची शिकार होत आहे.एफएओच्या माहिती नुसार भारतात २००८ मध्ये २० करोड १० लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते.ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या २०२३ च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्व भुकमरी सुचकांकमध्ये १२५ देशांच्या तुलनेत १११ वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे.या उलट भारताच्या शेजारील देशांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती भारतापेक्षा चांगली आहे यात पाकिस्तान- १०२, बांगलादेश-८१, नेपाळ-६९, श्रीलंका -६० व्या स्थानावर आहे.भारतात सर्वेमध्ये हेही लक्षात आले की लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे. आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कण वाचवीण्याची गरज आहे.आज अन्नाचा प्रत्येक दाना महत्वाचा आहे. तेव्हाच म्हणतात ''दाने दाने पे लिखा है, खाने वाले का नाम'' या म्हणीची पुर्ततः होवु शकते.आज १४५ कोटी जनतेचे दायीत्व बनते की अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी १४५ कोटी जनतेला विनंती करतो की ''अन्नाचा एक-एक कण वाचवीण्याची नीतांत गरज आहे.कारण देशातील वाढती लोकसंख्या,जगातील युद्धजन्य परिस्थिती, बदलते हवामान व अलनिनोचा प्रभाव पहाता अन्न-धान्याचे जतन करने अत्यंत गरजेचे आहे.कारण भारतात बालकांच्या कुपोषणाची स्थिती अत्यंत वाईट आहे.त्याचप्रमाणे मी सरकारला आग्रह करतो की अन्न-धान्याचा काळाबाजार ताबडतोब रोखला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवरल्या पाहिजे.तेव्हाच विश्व खाद्य दिवसाला खरे महत्व येईल.संपुर्ण जग एकीकडे खाद्यांनासाठी आठा-पीटा करून वन-वन हिंडत आहे तर दुसरीकडे संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसल्याचे दिसून येते.म्हणजेच आज जगात खाद्यान्ना पेक्षा, निसर्गापेक्षा व पाण्यापेक्षा दारूगोळ्याला जास्त महत्व दील्याजात आहे.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवू शकतो.याकरिता जीवन जगण्यासाठी खाद्यांनाकडे व निसर्ग वाचवण्यासाठी प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण,भुकमरी याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# माणगांव येथे 'सेवा संकल्प अभियान'उत्साहात संपन्न; ४५३ लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ

## पालकमंत्री नामदार भरतशेठ गोगावले आणि नामदार अदिती ताई तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभहस्ते कार्यक्रमाचे उदघाटन

माणगांव येथे ''सेवा संकल्प अभियान'' उत्साहात संपन्न; ४५३ लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील २५ वर्षांच्या यशस्वी कारकिर्दी निमित्त ''सेवा परमो धर्मः'' या उक्तीप्रमाणे शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ९ सप्टेंबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार राज्यभरात ''सेवा संकल्प अभियान'' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी माणगांव येथील मध्यवर्ती प्रशासकीय भवन, तहसील कार्यालयाच्या सभागृहात ''सेवा संकल्प अभियान शिबिर'' अत्यंत उत्साहात पार पडले.सदर शिबिराचे उदघाटन रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. भरतशेठ विठाबाई मारुती गोगावले (मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास) आणि महिला व बालविकास मंत्री मा. ना. कु. आदितीताई वरदा सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभहस्ते झाले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार श्री. विपीन लोकरे यांनी केले. व्यासपीठावर उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप, नगराध्यक्ष, पंचायत समिती सभापती, जिल्हा




परिषद सदस्य, नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

**४५३ लाभार्थ्यांना लाभ वाटपः**

या शिबिराच्या माध्यमातून माणगांव तालुक्यातील विविध विभागांशी संबंधित एकूण ४५३ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष योजनांचे लाभ व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यापैकी ८८ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात दोन्ही मंत्री महोदयांच्या हस्ते थेट लाभ प्रदान करण्यात आला.

**विभागनिहाय लाभाचा तपशीलः**

- ✻महसूल विभाग (२३६ लाभार्थी):✻ नॉन-क्रिमीलेअर ४१, जातीचा दाखला २७, उत्पन्नाचा दाखला ३३, डोमिसाईल ११, गाव नमुना ७/१२ व १२ ई २, जिवंत ७/१२ - ६४, विलंबाने जन्म-मृत्यू नोंद १३, वनपट्टेधारक ७/१२ - २, शिधापत्रिका ४०.
- ✻नगरपंचायत (११५ लाभार्थी):✻ सर्वांसाठी घरे अंतर्गत अतिक्रमण नियमन सनद १८, प्रधानमंत्री आवास शहरी-२.० - ३५, शबरी आदिवासी घरकुल ३७, जन्म-मृत्यू सनद १५.
- ✻महिला व बालविकास, आरोग्य, कृषी व इतर:✻ लेक लाडकी योजना, मातृवंदना, बेबी केअर किट, दिव्यांग प्रमाणपत्र ११, विवाह नोंदणी, कर आकारणी उतारा १७, महिला शेतकरी प्रमाणपत्र २८, ट्रॅक्टर अनुदान, आयुष्मान भारत कार्ड २०, कार्ड २० आदी लाभांचे वाटप झाले. या प्रसंगी मंत्री आदिती तटकरे आणि पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गट विकास अधिकारी, माणगांव यांनी मानले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी मा. श्री. किशन जावळे (भा.प्र.से.), अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले आणि उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

शासकीय योजनांचा लाभ थेट आणि जलद गतीने नागरिकांपर्यंत पोहोचवणे हाच या अभियानाचा मुख्य उद्देश असून, या भव्य शिबिरास नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# कोजागरी पौर्णिमेनिमित्त जालना शहरात अवजड वाहनांना प्रवेशबंदी

**जालना - प्रतिनिधी**

कोजागरी पौर्णिमेनिमित्त जालना शहरातील बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या काळात वाहतूक कोंडी होऊ नये, नागरिकांची सुरक्षितता राखली जावी आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी जालना शहरातील अवजड वाहनांच्या वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांनी यासंदर्भात आदेश जारी केले आहेत. रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी कोजागरी पौर्णिमा साजरी होणार आहे. या दिवशी शहरातील रस्त्यांवर नागरिकांची व वाहनांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अवजड वाहनांमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी काही प्रमुख मार्गांवरील अवजड वाहनांची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३६ अन्वये पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांनी हा आदेश काढला आहे. त्यानुसार दि. २५ ऑक्टोबर रोजी रात्री १२.१ वाजेपासून ते रात्री १२ वाजेपर्यंत संबंधित मार्गांवरील अवजड वाहनांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे.

**चार मार्गांवरील वाहतुकीत बदल**

जालना-अंबड-वडिगोद्री-शहागड मार्ग : या मार्गाने बीडकडे जाणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक जालना-गोलापांगरी-छत्रपती शिवाजी महाराज चौक-अंबड मार्गे पाचोड-वडिगोद्री-शहागड मार्गाने बीडकडे वळविण्यात येणार आहे. घनसावंगी-अंबड-जालना मार्ग : घनसावंगी येथून अंबडमार्गे जालन्याकडे येणाऱ्या अवजड वाहनांसाठी सुतगिरणी चौफुली, घनसावंगी, राणीउंचेगाव फाटा तसेच अंबड परिसरातील निर्धारित पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक वळविण्यात येणार आहे.

# लाखो भाविकांचे श्रद्धास्थान सौंदत्तीची येल्लम्मा देवी..!!

...कर्नाटक राज्यात बेळगाव जिल्ह्यातील सौंदत्ती हे एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. जिथे येल्लम्मा देवीचे स्थान आहे. ही देवी दक्षिण भारतात विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूमध्ये मातृदेवी स्वरूपात पुजली जाते. अत्यंत प्राचीन असे हे मंदिर कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेजवळील एक मुख्य तीर्थक्षेत्र असून विविध राज्यातील भाविक येथे देवीच्या दर्शनासाठी येतात. चला तर या देवस्थानाविषयी अधिक माहिती घेऊया...

मंदिराचा इतिहास आणि स्वरूप..

सौंदत्तीच्या येल्लम्मा माऊलीचे मंदिर हे इ.स. १५१४ च्या सुमारास बांधल्याचे सांगितले जाते. भारतीय मंदिर स्थापत्यकलेचा भाग असलेल्या चालुक्य शैलीतील वास्तुकलेचे उत्तम उदाहरण म्हणजे सौंदत्तीचे येल्लम्मा मंदिर. या मंदिरात येल्लम्मा देवी ही मुख्य देवता आहे. जिला रेणुका माता म्हणूनही ओळखले जाते. ही देवता परशुरामाची आई आणि महाशक्तीचा दिव्य अवतार आहे. या ठिकाणी विविध जाती-धर्माचे भक्त समुदाय मोठ्या श्रद्धेने देवीची उपासना करतात. मंदिराची आख्यायिका..

पुरातन काळापासून सौंदत्तीची येल्लम्मा म्हणजेच रेणुका म तिच्या या मंदिराशी संबंधित एक आख्यायिका सांगितली जाते. त्यानुसार, रेणुका ही रेणु राजाची कन्या होती. जिने क्रोधासाठी प्रसिद्ध असलेल्या जमदग्नी ऋर्षीसोबत विवाह केला. ऋषी जमदग्नी आणि रेणुका यांना पाच पुत्र होते. त्यांपैकी एक म्हणजे परशुराम. रेणुकेला पतीप्रती असलेल्या पवित्रतेमुळे आणि भक्तीमुळे वाळूचे भांडे बनवण्याचे



अलौकिक वरदान होते. एकेदिवशी आकर्षित झाली आणि यामुळे तिचे पावित्य भंगले. परिणामी रेणुकेला स्वतः ची वाळूचे भांडे बनवण्याची शक्ती गमवावी लागली. देवशी रेणुकेला तपोबलाने ऋषी जमदग्नींना घडलेला प्रकार लक्षात आला. संतापाच्या भरात त्यांनी मुलांना मातेचा शिरच्छेद करण्याचा आदेश दिला. परशुरामांनी वडिलांच्या आज्ञेचे पालन केले आणि स्वतःच्याच आईचा शिरच्छेद केला. इतकेच नव्हे तर वडिलांच्या आज्ञेचे पालन करण्यास नकार देणाऱ्या आपल्या भावांचाही त्यांनी शिरच्छेद केला. परशुरामांना आपल्या हातून घडलेल्या कृत्याचा पश्चाताप होताच त्यांनी पित्याकडे आई आणि भावांचे प्राण परत मागितले. त्याक्षणी पितृआज्ञेचे पालन करणाऱ्या परशुरामांना ऋषी जमदग्नींनी जीवनदानाचा वर दिला. ज्याचा वापर करून परशुरामांनी आपल्या आईला आणि भावांना पुन्हा जिवंत केले. यावेळी परशुरामांनी काळा वर्ण असलेल्या एका मृत स्त्रीचे शीर माता रेणुकेच्या धडाला जोडले. ज्यामुळे रेणुका देवी येल्लम्मा म्हणून ओळखली जाऊ लागली. अन्य काही आख्यायिकेनुसार, शिरच्छेदानंतर रेणुका मातेचे शीर ज्या ज्या ठिकाणी पडले त्या त्या ठिकाणी रेणुका देवीचे स्थान तयार झाले. त्यापैकी एक म्हणजे सौंदत्ती. दक्षिण भारतात या देवतेला संरक्षक देवी म्हणून पुजले जाते. भक्तांची श्रद्धा



सौंदत्तीची येल्लम्मा देवी अनेकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिरात पूजा केल्याने शारीरिक तसेच मानसिक त्रासातून मुक्ती मिळते. उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि जीवनात यश मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे. तसेच येल्लम्मा माऊलीकडे मनोभावे प्रार्थना केल्यास नकारात्मक शक्तींपासून रक्षण होते, असेही म्हटले जाते. या मंदिराशी गोंधळी, जोगतीण आणि देवदासी परंपरा पूर्वीपासून जोडलेली आहे. मात्र, गेल्या काही काळात सशक्त सामाजिक बदलांमुळे या परंपरा लोप पावताना दिसत आहेत. उदे ग आई उदे...!!

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर**

# जलसंवर्धनाचा संकल्प प्रत्येक नागरिकानेकृतीत उतरवावा - महापौर वंदना मगरे

## श्री गणेश महासंघातर्फे जलसंवर्धन व जनजागृती अभियानाचा शुभारंभ

**जालना - प्रतिनिधी**

पाणी हे केवळ नैसर्गिक साधन नसून मानवी जीवनाचा आधार आहे. दिवसेंदिवस बदलणारे हवामान, पावसाचे अनियमित प्रमाण आणि भूजल पातळीत होणारी घट लक्षात घेता जलसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि पाणी बचतीचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे यांनी केले.

श्री गणेश महासंघाच्यावतीने बुधवार दि. १४ ऑक्टोबर रोजी दानकुंवर कन्या विद्यालयात आयोजित जलसंरक्षण व जनजागृती अभियानाच्या कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दानकुंवर कन्या विद्यालय समितीचे अध्यक्ष महेंद्र गुप्ता हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, संस्थेचे संचालक संचालक जगदीश



अग्रवाल, नरेश अग्रवाल तर व्यासपीठावर श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष शलोक अग्रवाल, कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत, वेणू रिषभ अग्रवाल, दानकुंवर कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रतिभा कोल्हे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या अभियानाच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पाण्याची उपलब्धता आणि जलसंवर्धनाचे महत्त्व याविषयी जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. वंदना मगरे पुढे म्हणाल्या की, जलसंवर्धनासाठी केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून राहून चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनात पाणी बचतीच्या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. घरातील पाण्याची गळती थांबविणे, उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे यांसारख्या छोट्या कृतींतूनही मोठा बदल घडवून आणता येतो. सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांनी एकत्र येऊन जलसंवर्धनाची चळवळ व्यापक करावी. आज जपलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पिढीच्या भविष्याला सुरक्षित करणारा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष शलोक जगदीश अग्रवाल यांनी आपल्या मनोगतात श्री गणेश महासंघच्या कार्यक्रमपत्रिकेत जलसंरक्षण आणि जनजागृती अभियानाला महत्त्वाचे स्थान देण्यात आल्याचे सांगून. 'जल है तो कल है' हा संदेश केंद्रस्थानी ठेवून पाण्याचे महत्त्व जनमानसात रुजविणे, पाण्याचा अपव्यय रोखणे आणि जलसंवर्धनाबाबत नागरिकांना जागरूक करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जलसंवर्धनातून जनकल्याण साधण्याच्या भूमिकेतून समाजातील विविध घटकांना या अभियानाशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जलसंवर्धन हा केवळ एका दिवसाचा कार्यक्रम न राहता लोकचळवळ बनला पाहिजे, असे सांगितले. पाणीटंचाईची समस्या गंभीर होण्यापूर्वीच नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने पाणी वाचविण्याचा संकल्प करून तो प्रत्यक्ष कृतीत उतरविल्यास समाजासमोरील पाणीटंचाईचे आव्हान कमी करण्यास मदत होईल. महासंघाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जनजागृतीसाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात महेंद्र गुप्ता यांनी जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. पाण्याचे नियोजन, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि जलस्रोतांचे जतन या बाबींना प्राधान्य देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पाण्याची बचत ही केवळ वैयक्तिक गरज नसून सामाजिक कर्तव्य आहे. नागरिक, व्यापारी, सामाजिक संस्था आणि शैक्षणिक क्षेत्रातील घटकांनी एकत्रित प्रयत्न केल्यास जलसंवर्धनाचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचू शकतो. श्री गणेश महासंघाच्या माध्यमातून समाजहिताचे उपक्रम राबविताना पर्यावरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संरक्षणालाही प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनांसाठी ३० ऑक्टोबरपर्यंत अर्ज करावेत

**जालना - प्रतिनिधी**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या जालना जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय (), विमुक्त जाती व भटक्या जमाती (), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक () आणि विशेष मागास प्रवर्गातील () विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज मागविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून त्याची प्रत संबंधित कार्यालयात सादर करावी, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना या योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी संबंधित संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांसाठी या योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येत आहे. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेअंतर्गत , आणि प्रवर्गातील विद्यार्थ्यांना, तर पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत - प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे.

या योजनांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० ऑक्टोबर २०२६ आहे. विद्यार्थ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जालना यांच्या कार्यालयात अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अभियान सेवा संकल्प अंतर्गत आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जालना यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्ह्यात विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दि. १५ आज रोजी अंबड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र धनगर पिंपरी येथे ५ किशोरवयीन १४ वर्ष पूर्ण व १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना एच पी व्ही लस देण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र सातोना अंतर्गत उपकेंद्र उस्मानपुर येथे ऊस तोडीसाठी आलेल्या कामगारांच्या टोळी वस्तीवर जाऊन आरोग्य तपासणी करून पोषण आहार, स्वच्छता बाबत माहिती देण्यात आली. जाफराबाद तालुक्यातील प्राथमिक आरोग्य वरुड बुद्रुक येथे ११ किशोरवयीन १४ वर्ष पूर्ण व १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना एच पी व्ही लस देण्यात आली. ज्यामुळे गर्भाशयाच्या मुख कर्करोगापासून संरक्षण मिळते तसेच बदनापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र दाभाडी अंतर्गत गोकुळवाडी येथे नियमित लसीकरण करण्यात आले. एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती व लसीकरणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किशोरवयीन मुलींच्या आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन एचपीव्ही लसीकरणाची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे मुलींमध्ये लसीकरणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होत आहे. लसीकरणाबाबत मार्गदर्शन करून लस देण्यात आली. या उपक्रमातून किशोरवयीन मुलींच्या आरोग्य संरक्षणाला प्राधान्य देण्यात येत असून, ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती व सेवा पोहोचविण्याचा प्रयत्न आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गट विकास अधिकारी यांच्या खुर्चीला दिले निवेदन

**परतूर - प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी परतुर तालुक्याच्या वतीने तालुक्यातील घरकुलधारकांची होत असलेली लूट त्यांच्या त्यांना पैशाशिवाय हप्ते न देण्याची प्रशासनाची आढळतो भूमिका त्यानंतर बिलांवर सरपंचांच्या सह्यांची राजकीय हेतूने मागणी, तालुक्यातील प्रलंबित इतर समस्या तसेच पंचायत समिती कर्मचाऱ्यांची सततची अनुपस्थिती याबाबतीत आज निदर्शने करण्यात आली यावेळी गट विकास अधिकारी, कौशल पाटील यांना निवेदन देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी गेले असता गट विकास अधिकारी पंचायत समितीच्या मागच्या दाराने पळून गेले त्यामुळे वंचित बहुजन आघाडीने त्यांच्या खुर्चीला निवेदन आणि हार घालून त्यांच्या या कृतीचा निषेध केला सर्वसामान्यांना न्याय



देण्याऐवजी केवळ भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांची पाठ राखण करणे हाच गट विकास अधिकारी कौशल पाटील यांचा हा झेंडा दिसतो त्यांना याबाबत अनेक वेळेला तक्रारी दिल्या पण त्यांच्या कार्यपद्धतीत कुठेही सुधारणा होत नसल्याकारणाने तालुक्यातील अनेक नागरिकांनी संताप व्यक्त केला यावेळी असे वाटले होते की एमपीएससी नियुक्त गट विकास अधिकारी पंचायत समितीला मिळालेले आहेत.

त्या मुळे कारभारात सुधारणा होईल पण याच्या आधीचेच बरे होते असे म्हणण्याची वेळ सर्वसामान्य नागरिकांवर आलेली आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत पैसा दो और काम लो अशा प्रकारची नीती पंचायत प्रशासन अवलंबित आहे या विरोधात वंचित बहुजन आघाडी वरिष्ठांकडे दाद मागणार आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष, रामप्रसाद थोरात. जिल्ह्याचे महासचिव, डॉ. त्रिभुवन सचिव. शेख जमीर भाई. ज्येष्ठ नेते, चोखानाना सौंदर्य. तालुका महासचिव, सिद्धार्थ कांबळे. जीवन सोनवणे. गणेश वैद्य. कराण मोरे. गौतम खंडागळे. गुलाबराव धोंडे. शिवाजी स्वामी विभुते हेमंत पहाडे स्वप्निल पहाडे. दीपक हिवाळे. राहुल हिवाळे. राहुल पहाडे. सिद्धार्थ कांबळे. ज्ञानाबाई मोरे. शेख. विष्णू बागल यांसह अनेक पदाधिकारी व लाभधारक उपस्थित होते या सगळ्या गोष्टीचा उल्लेख करून वरिष्ठांकडे दाद मागण्याची भूमिका घेऊन वंचित बहुजन आघाडीने आजचे हे आंदोलन थांबवले.

# शेतकऱ्यांना विनाअट पीककर्ज द्या; सीबीलची अट रद्द करण्यासह बचत गटांचे कर्ज माफ करण्याची संजु जाधव यांची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, त्यांना कोणतीही अट न लावता तातडीने पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे संजुभाऊ जाधव यांनी संबंधीत अधिकाऱ्यांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शासनाने या मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास जिल्हा बंदची हाक देण्यात



येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे जीवन जगणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याऐवजी बँकांच्या विविध अटींमुळे पीककर्ज मिळण्यात अडचणी येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना बँकांकडून लावण्यात येणारी सीबील स्कोअरची अट रद्द करून त्यांना तातडीने पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच बचत गटांचे कर्ज माफ करावे, मध्यवर्ती बँकेतील पात्र शेतकऱ्यांना विलंब न करता पीककर्ज द्यावे, तसेच खासगी फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची कर्जवसुली एक वर्षासाठी स्थगित करावी, अशा मागण्याही *(पान २ वर)*

# क्रांतीगुरु लहुजी साळवे विकास परिषदेच्या प्रभारीपदी भारत जाधव

**जालना -प्रतिनिधी**

क्रांतीगुरू लहुजी साळवे विकास परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेश प्रभारीपदी जालना जिल्ह्यातील सामाजिक नेते भारत जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. क्रांतीगुरू लहुजी साळवे विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उत्तमराव कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली जालना शहरात नुकत्याच संपन्न झालेल्या बैठकीत संघटनात्मक बांधणी, कार्यविस्तार आणि सामाजिक कार्याला गती देण्याच्या दृष्टीने विविध पदाधिकाऱ्यांच्या



नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. या बैठकीत जालना जिल्ह्यातील भारत जाधव यांची प्रदेश प्रभारीपदी, किशोर कांबळे यांची जालना जिल्हाध्यक्षपदी, प्रकाश शेजुळ यांची युवा मराठवाडा अध्यक्षपदी, रंजीत शेजुळ यांची जालना जिल्हा कार्याध्यक्षपदी, त्रिंबक पाटोळे यांची युवा जालना जिल्हा कार्याध्यक्षपदी तर जितेंद्र हिवाळे यांची मराठवाडा सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. यासह संघटनेतील विविध पदांवर कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.यावेळी सामाजिक व कार्याची दखल घेत सुरेश कांबळे आणि अंकुश राजगीरे यांचा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उत्तमराव कांबळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

बैठकीस संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद कांबळे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य योगेश दणके, मराठवाडा अध्यक्ष सुरेश भाऊ घोरपडे, गंगेश आघाम, मंगेश खंडागळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटोदा शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांनी केले पुस्तकांचे वाचन, परीक्षण व डॉ. कलाम यांच्या चित्रांचे रेखाटन



**मंठा - प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा येथे १५ ऑक्टोबर,२०२६ रोजी माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी पुस्तकांचे वाचन, पुस्तकांचे थोडक्यात परीक्षण तसेच डॉ. कलाम यांच्या चित्रांचे रेखाटन केले. विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्याविषयी मनोगतेही व्यक्त केली. प्राथमिक शिक्षक गंगाधर वानोळे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास सांगून वाचनाचे महत्त्व विशद केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, देविदास मामीलवार, गीता बरसाले यांच्यासह शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# जालना शहरात १५ ते १७ ऑक्टोबरदरम्यान अवजड वाहनांच्या वाहतुकीत बदल

## नवरात्रोत्सव व दसऱ्यानिमित्त वाहतूक नियोजन; पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे पोलिसांचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

नवरात्रोत्सव आणि दसरा सणानिमित्त जालना शहरातील बाजारपेठा व प्रमुख रस्त्यांवर नागरिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या काळात वाहतूक कोंडी होऊ नये, नागरिकांची सुरक्षितता राखली जावी तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी जालना शहरातील अवजड वाहनांच्या वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. यासंदर्भात जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांनी आदेश जारी केले आहेत. नवरात्रोत्सव व दसरा सणाच्या पार्श्वभूमीवर दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजेपासून ते दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संबंधित मार्गांवरील अवजड वाहनांची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. सणासुदीच्या काळात बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढते. अशा वेळी अवजड वाहनांची वाहतूक सुरू राहिल्यास वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३६ अन्वये हा आदेश जारी करण्यात आला आहे. जालना शहरातून अंबडकडे जाणारी तसेच बीडकडून अंबडमार्गे येणारी अवजड वाहतूक निर्धारित पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. चार प्रमुख मार्गांवरील वाहतुकीत बदल जालना-अंबड-वडिगोद्री-शहागड मार्ग : या मार्गाने बीडकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना जालना-गोलापांगरी-छत्रपती शिवाजी महाराज चौक-अंबड-पाचोड-वडिगोद्री-शहागड मार्गे बीडकडे जाता येणार आहे. घनसावंगी-अंबड-जालना मार्ग : घनसावंगी येथून अंबडमार्गे जालन्याकडे येणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक सुतगिरणी चौफुली-घनसावंगी-गुरुपिंपरी-राणी उंचेगाव फाटा-अंबड येथील महालक्ष्मी पेट्रोल पंप चौक-गोलापांगरी मार्गे जालन्याकडे वळविण्यात येणार आहे.

घनसावंगी-अंबड-शहागड मार्ग : घनसावंगी येथून अंबडमार्गे शहागडकडे जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी सुतगिरणी चौफुली-घनसावंगी-तिर्थपुरी-सुखापुरी-वडिगोद्री मार्गे शहागडकडे जाण्याचा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला आहे. पाचोड-अंबड-घनसावंगी मार्ग : पाचोडकडून अंबडमार्गे घनसावंगीकडे जाणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूक अंबड येथील महालक्ष्मी पेट्रोल पंपाजवळील राणी उंचेगाव फाटा मार्गे घनसावंगीकडे वळविण्यात येणार आहे.

अवजड वाहनांच्या वाहतुकीतील हे बदल दि. १५ ऑक्टोबर रोजी रात्री १२.०१ वाजेपासून दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहेत. त्यामुळे ट्रक, मालवाहू वाहने आणि इतर अवजड वाहनांच्या चालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा. वाहतूक नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.